स.फौ.ख. क्र. २२२/२०२४
शिवशंकर नागरी वि. पंकज
MHBU180005102024

| | |
|---|---|
| | **निशाणी क्र. ३१ वरील आदेश** |
| | (दिनांक ०४.०८.२०२६) |

प्रस्तुतचा अर्ज आरोपीविरुध्द दि. २९.०७.२०२५ रोजी उलटतपास बंदचा आदेश रद्य होवून उलटतपास घेण्याची परवानगी मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. आरोपीचे असे म्हणणे आहे की, आरोपीविरुध्द २९.०७.२०२५ रोजी उलटतपास बंदचा आदेश होवून पुढे प्रकरण चालविण्याचा आदेश पारित झालेला असून आरोपीला मागील तारखेस काही कारणास्तव फिर्यादीचा उलटतपास घेता येवू शकला नाही. अर्ज मंजूर झाल्यास फिर्यादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब आरोपीचा अर्ज मंजुर करुन उलटतपास दाखल करण्यास परवानगी मिळावी ही विनंती केली आहे.

३. फिर्यादीने सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केले आहे की, अर्जास तीव्र विरोध. फिर्यादीला त्रास देण्याकरिता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. सबब त्यांनी अर्ज खर्चासह खारीज करण्याची विनंती केली आहे.

४. फिर्यादी व आरोपी यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रस्तुत प्रकरणामध्ये आरोपी याला उलटतपास घेण्याची पुरेशी संधी देण्यात आली असल्याचे दिसून येते. तथापि, त्यांनी उलटतपास घेतला नसल्याने दिनांक २९.०७.२०२५ रोजीच्या आदेशान्वये आरोपी यांच्या विरुध्द विना उलटतपास प्रकरण चालविण्याचा आदेश पारित झाला असल्याचे दिसून येते. प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता प्रस्तुतचे प्रकरण हे निगोशिएबल इन्स्ट्रुमेंन्ट अॅक्टचे कलम १३८ दाखल केलेला असुन सन २०२४ रोजी दाखल झालेले आहे. करिता प्रकरणाचे स्वरुप पाहता माझ्यामते आरोपीस उलटतपास घेण्याची संधी देणे न्यायोचित होईल. याशिवाय अर्जामध्ये नमुद केलेले कारण पाहता ते पूरेसे असल्याचे दिसून येत आहे. परंतु, आरोपी यांनी वेळेवर त्यांचा

सं.फौ.ख. क्र. २२२/२०२४
शिवशंकर नागरी वि. पंकज
MHBU180005102024

उलटतपास घेतला नसल्याने निश्चितच प्रकरणामध्ये विलंब झालेला आहे. त्यामुळे अर्ज मंजुर करतांना त्यांच्यावर दंड आकारणे न्यायोचित होईल. परिणामी मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. आरोपीचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. आरोपीविरुध्द दि. २९.०७.२०२५ रोजी झालेला विना उलटतपास आदेश रद्य करुन आरोपीस उलटतपास घेण्याची परवानगी आरोपीने रक्कम रुपये ५००/– चा दंड भरणा करावा व सदर दंडाची रक्कम फिर्यादीला देण्यात यावी या अटीवर मंजुर करण्यात येते.

SWAPNIL LILADHAR RAMTEKE
Digitally signed by SWAPNIL LILADHAR RAMTEKE
Date: 2026.08.04 16:16:57 +0530

दिनांक: ०४.०८.२०२६

(स्वप्नील लि. रामटेके)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, संग्रामपुर

सं.फौ.ख. क्र. २२२/२०२४
शिवशंकर नागरी वि. पंकज
MHBU180005102024

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, पीडीएफ फाईल मधील मजकूर हा मुळ न्यायानिर्णयाप्रमाणे शब्द न शब्द जशास तसा व बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – एस. जी. जैन

कार्यालयाचे नाव – दिवाणी व फौजदारी न्यायालय, संग्रामपुर

लघुलेखक